# लेखा लिपिक या पदाच्या जाहिरातीबाबत शुद्धिपत्रक क्र. 3

सिडको महामंडळाने दि.09.12.2023 रोजी लेखा लिपिक या पदाची जाहिरात प्रसिद्ध केली होती. सदर जाहिरातीतील मुद्दा क्र. 7 (2) मध्ये नमुद केल्याप्रमाणे जाहिरातीमध्ये प्रसिद्ध केलेल्या रिक्त पदांच्या आरक्षणामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी:-

| **प्रवर्ग** | **अ.जा.** | **अ.ज.** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **भ.ज. (क)** | **इ.मा.व.** | **एसई बीसी** | **आ.दु.घ.** | **अराखीव** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | 3 | **1** | 1 | 1 | 1 | 5 | **2** | **2** | **6** | **22** |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/ समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:-** | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 2 | **1** | 1 | 1 | 1 | 1 | **1** | 1 | **2** | 11 |
| महिला-30% | 1 | - | - | - | - | 1 | **1** | 1 | **2** | 6 |
| माजी सैनिक-15 % | - | - | - | - | - | 1 | - | - | **1** | 2 |
| प्रकल्पग्रस्त-5% | - | - | - | - | - | 1 | - | - | - | 1 |
| अंशकालीन-10% | - | - | - | - | - | 1 | - | - | **1** | 2 |
| अनाथ-1% | शासन निर्णय क्रमांक अनाथ-2018/प्र.क्र.182/का-3, दि.23.08.2021 नुसार अनाथ प्रवर्गातील पदे भरली जातील. | | | | | | | | | |
| दिव्यांग-4%. | शासन निर्णय क्रमांक दिव्यांग 2018/ प्र.क्र. 114/16-अ, दि. 29.05.2019 नुसार दिव्यांगासाठी आरक्षित असलेली पदे भरली जातील. | | | | | | | | | |

वरील आरक्षणातील बदलाच्या अनुषंगाने व शासन निर्णय दिनांक 27 फेब्रुवारी, 2024 अन्वये जातीचा प्रवर्ग बदलू इच्छित असणाऱ्या उमेदवारांकरीता स्वतंत्रपणे लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

जात प्रवर्ग बदलण्यास इच्छुक उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सुचना:-

1. https://ibpsonline.ibps.in/cidcoacjun23/ या लिंकद्वारे इतर मागास वर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), व खुल्या/ अराखीव प्रवर्गातील (OPEN) उमेदवारांना त्यांचा प्रवर्ग बदलून एसईबीसी (SEBC) प्रवर्गातून दि. 20.12.2024 ते दि. 02.01.2025 या कालावधीत अर्ज सादर करता येणार आहे.
2. वरील मुद्दा क्रमांक 1 अन्वये प्रवर्ग बदलु इच्छिणाऱ्या उमेदवारांव्यतिरिक्त यापुर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना जर त्यांचा प्रवर्ग बदलून इतर प्रवर्गातुन नव्याने अर्ज सादर करावयाचा असल्यास-
   a) अशा उमेदवारांना नजिकच्या काळात www.cidco.maharashtra.gov.in या सिडको संकेतस्थळावर करिअर सेक्शन अंतर्गत लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल त्या लिंकद्वारे नव्याने अर्ज सादर करावा लागेल.
   b) तसेच नव्याने परीक्षा शुल्क भरावे लागेल व याआधी भरणा करण्यात आलेल्या परीक्षा शुल्काचा परतावा मिळणार नाही.
   c) एकापेक्षा अधिक अर्ज सादर केलेल्या उमेदवारांच्या अर्जापैकी त्यांनी सादर केलेला शेवटचा अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.
3. वरील मुद्दा क्रमांक 1 व 2 व्यतिरिक्त नव्याने अर्ज सादर करु इच्छिणाऱ्या उमेदवारांकरीता नजिकच्या काळात www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर करिअर सेक्शन अंतर्गत लिंक उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरीता उमेदवारांनी सिडको संकेतस्थळाला भेट द्यावी.

व्यवस्थापक (कार्मिक)

दिनांक-20.12.2024